हुआना इनेसचे पुस्तकालय
हुआना इनेसची दुनिया



लेखनः पैट मोरा, चित्रः बिएट्रिज विडाल

मराठी: अश्विनी बर्वे



हुआना इनेसचे पुस्तकालय
हुआना इनेसची दुनिया



लेखनः पैट मोरा, चित्रः बिएट्रिज विडाल
मराठी: अश्विनी बर्वे



आभार

मी सर्व सोर हुआनिस्ताओं (भगिनी हुआनाचे प्रशंसक), सोर हुआनाचे अध्ययन करणारे विद्वान, खासकरून मार्गरेट सेयर्स पेयडनचे आभार मानू इच्छिते.



माझ्या पुस्तकप्रेमी मुलांसाठी बिल, लिबी व सिसी

- पी.एम.


माझ्या आईवडिलांना, ज्यांनी मला गुलाबी पंख आणि मध दिले.

- बी.वी.





“हुआना इनेस!” आईने हाक मारली. “तू काय करते आहेस?” हुआनाने एक मोठेसे पुस्तक बंद केले. तिचे पेद्रो आजोबा नेहमी वाचत असत. इथेचे मेक्सिको शहराच्या जवळ नवीन स्पेन मध्ये बांधलेल्या त्यांच्या घरात पेद्रो आजोबा आपला वाचनाचा छंद जोपासत असत. त्यांच्या घरात इकडेतिकडे पुस्तकांचे ढीग असे. हुआना, आजोबांची पुस्तके उचलून एक घर तयार करत असे. ती पुस्तके उघडून त्यातली पाने उलटत असे आणि त्यातली चित्रे बघत असे. तिला वाचायला येण्यासाठी ती छोटी होती. पण तिला जाणून घ्यायचे असे की ते शब्द काय सांगत आहेत?





हुआनाचा जन्म खूप पूर्वी १६४८ मध्ये झाला होता. ती जेव्हा तीन वर्षाची होती तेव्हा तिचा आवडता प्रश्न होता, “का?”

‘‘ज्वालामुखीतून धूर का निघतो?” घराच्या बाहेर खेळतांना ती डोंगरातून निघणाऱ्या धूरांकडे बघत तिने विचारले.

‘‘आई, पाने हिरवी का असतात?” नदीजवळ फुलं गोळ्या करतांना हुआनाने विचारले.



हुआनाला आपल्या घरात उगवलेले मुलायम पण काटेरी गुलाब खूप आवडत असत. ती बोटांच्या पेराने फुलांच्या पाकळ्यांवर आणि काटयांवर हळुवार हात फिरवत राही. त्याचा गोड सुगंध घेत असे. ती त्यावर कविता करत असे. रोज़ा हरमोसा, रोज़ा हरमोसा (सुन्दर गुलाब, सुन्दर गुलाब)।

ती शब्दांशी खेळत असे. ती दगडांच्या रस्त्यावरून पळत असे आणि गाणी म्हणत असे, ‘‘लूना, कूना, बैल्ला एस्तरैला (चांदोबाच्या पाळण्यावर सुंदरसा तारा)





एका सकाळी हुआना इनेसच्या मोठ्या बहिणीने म्हटले,, “हुआना इनेस, मी आज तुझ्याबरोबर खेळू शकणार नाही.”

’’का?’’ हुआना इनेसने विचारले.

“मी जवळच्याच घरात वाचन आणि लेखन शिकायला जाणार आहे.” तिच्या बहिणीने सांगितले. “मी आजोबांसारखे पुस्तके वाचेन.”

“मी पण! मला पण तुझ्याबरोबर यायचे आहे!” हुआना इनेसने म्हटले.

“आई मलापण वाचायला शिकायचे आहे.”



“पण तू तर अजून खूप लहान आहेस, हुआना इनेस,” आई म्हणाली.

रोज हुआना इनेस आपल्या मोठ्या बहिणीला शाळेत जातांना बघत असे.

एक दिवस जेव्हा आई दुसऱ्या कामात व्यग्र होती तेव्हा, हुआना इनेस मोठ्या बहिणीच्या मागे गेली. ती सावधपणे झाडांच्या मागे लपतछपत गेली. जेव्हा शाळेत शिकणाऱ्या मुली आत गेल्या, हुआनाने खिड़कीतून डोकावून बघितले. त्या मुली लिहित आणि वाचत होत्या.





दुसऱ्या दिवशी हुआनाने आपल्या बहिणीचा परत पाठलाग केला,पण यावेळी ती लपून बसली नाही. ती सरळ आत शिक्षिकेजवळ गेली आणि म्हणाली, ''सिनोरा, मला वाचायला शिकायचं आहे, तुम्ही मला शिकवल का?"

मोठ्या मुली एवढ्याशा मुलीचे शब्द ऐकून हसू लागल्या. पण शिक्षिकेने तिच्याकडे लक्षपूर्वक बघितले आणि म्हटले "हो तू वाचण्यासाठी इथे येऊ शकते हुआना, पण तुला मनलावून शिकावे लागेल आणि चांगले वागावे लागेल.

''मी कासवासारखी गप्प बसेन,"' हुआना म्हणाली.

''तुला आधी अक्षरे ए,बी,सी,डी शिकावे लागतील. "शिक्षिका म्हणाल्या.

''का?'' हुआनाने त्वरित आपला आवडता प्रश्न विचारला. ''आपण अक्षरांपासूनच शब्द तयार करतो. हे बघ आर ओ एस ई रोज. हुआना इनेसने रोझ म्हणजे गुलाबचे अक्षरे बघितली. तिला ते गुलाबांच्या पाकळ्यांसारखे वाटले.





घरी आल्यावर हुआनाने परत परत अक्षरे गिरवली. तिने लवकरच लिहायला आणि वाचायला सुरुवात केली. आणि ती छोट्या छोट्या कविता करू लागली. “आई मी तुझ्या वाढदिवसासाठी एक कविता लिहू का?” मी त्यात म्हणेन की तू एका सुंदर ताऱ्यासारखी चमकते, ऊना, एस्ट्रैला बैला, किंवा तू सुंदर गुलाबासारखी हसते, ऊना रोज़ा हरमोसा. ठीक?''

मी ममा एस ऊना एस्ट्रेला बैला,

मी ममा एस ऊना रोज़ा हरमोसा।

दुपारच्या जेवणात हुआना इनेसला गरमागरम टॉरटियास (मक्याची रोटी) बरोबर हळूहळू चीज चघळायला आवडत असे.

''चीज़ खाऊ नको हुआना इनेस. जे लोक चीज़ खातात ते चतुर नसतात. त्यांच्या डोक्यात चीज जाऊन बसते,” शाळेत एका मैत्रिणीने हुआनाला म्हटले.

त्या दिवशी हुआना इनेसने आपल्या आई आणि आजोबांना सांगितले की “आजपासून मी चीज खाणार नाही, त्यामुळे माझे डोके खराब होईल.”


आजोबा हसले. ''हे तुला कोणी सांगितले?” त्यांनी विचारले.


''माझ्या मैत्रिणींनी,” हुआनाने उत्तर दिले. “मी चीज खाणार नाही, आई कारण मला शिकण्यासाठी मेक्सिकोला जायचं आहे.”

''मैक्सिको शहर!'' तिची आई म्हणाली.



''हो, माझ्या शिक्षिकेने सांगितले की तिथे एक मोठे विश्वविद्यालय आहे. तिथल्या वाचनालयात हजारो पुस्तके आहेत. जरा विचार कर?” ''विश्वविद्यालयात फक्त मुलगेच जाऊ शकतात, हुआना इनेस,'' तिची आई म्हणाली.





दुसऱ्या दिवशी रात्री हुआना जेवायला मुलांचे कपडे घालून आली. “हुआना इनेस!” आई रागावून म्हणाली, “हे तू काय करते आहेस?”

“मी अभ्यास करत आहे, म्हणजे मोठं झाल्यावर मी मैक्सिको शहरातील विश्वविद्यालयात शिकायला जावू शकेन. मला त्यांच्या वाचनालयात जायचं आहे. मला संगीत, वनस्पती आणि ताऱ्यांचा अभ्यास करायचा आहे. मला कविता लिहण्याची इच्छा आहे. तुला तर माहितच आहे ना आई, मुली मुला इतक्याच चतुर असतात.

“हुआना इनेस, तू गुलाबांच्या काट्याइतकी उद्धट आहेस. शेवटचं सांगते, फक्त पुरुषच विश्वविद्यसलयात जाऊ शकतात.” आईने कठोर आवाजात सांगितले. “तू नशीबवान आहेस जिला लिहायला वाचायला येते. मुलींनी घरात मदत करायची असते.”

“पण आई मुली कापणे-शिवणे यापेक्षा जास्त काही करू शकते.” हुआना वाद घालत म्हणाली. “आम्ही शिकू शकते, आणि जे काही आम्ही जाणून घेतलं, शिकलो ते आम्ही सिद्ध करू शकतो.”






हुआना जेव्हा आठ वर्षाची होती, तेव्हा एक दिवस ती धावत घरी आली आणि आईला म्हणाली, “आई,बघ,मला चर्चमध्ये झालेल्या कविता लेखन स्पर्धेत सगळ्यात चांगली कविता लिहली म्हणून बक्षीस मिळाले. ते ही एक पुस्तक! आता मी स्वतःचे वाचनालय तयार करू शकते.

पुस्तके हुआनाचे शिक्षक होते. महिनो न महिने ती आजोबांची पुस्तके वाचत राहिली आणि परत परत म्हणत राहिली - ‘‘पॉर फेवॉर ममा! कृपा करून मला मेक्सिको शहरात शिकायला पाठव ना.” शेवटी ती जेव्हा दहा वर्षाची झाली तेव्हा तिच्या आईने तिच्या मावशी-मावश्याकडे मेक्सिकोला पाठवले.







एका मोठ्या शहरात येणं किती उत्तेजित करणारं आहे. हुआनाने वेगवेगळ्या लोकांना बघितले, अनेक भाषा तिने ऐकल्या आणि जेव्हा ती महाल आणि विश्वविद्यालयाजवळून गेली तेव्हा ती आनंदाने हसली. ''टिया मारिया,'' ती आपल्या मावशीला म्हणाली, ''टान्टो क्वे वेरा! क्वे वाय अ सेर?'' मारिया मावशी एवढं सगळं बघण्यासारखं आहे. शेवटी मी कोण होऊ?



मुली विश्वविद्यालयात शिकू शकत नव्हत्या. हुआनाच्या मावशीने घरी येऊन शिकवणारे शिक्षक नेमले. ''सेनोर, मी चर्चमध्ये लॅटिन ऐकते, तुम्ही मला लॅटिन शिकवाल का?'' हुआना लवकरच आपल्या शिक्षकांकडून दुसरी भाषा शिकू लागली. तिला सजण्याधजण्यापेक्षा पुस्तकांची काळजी वाटत असे. ती आपल्या डोक्यावर बोटांनी टकटक करत म्हणे, “मी माझ्या डोक्याचा बाहेरचा भाग कशाला सजवू? जर ते आतमध्ये एकदम रिकांम आहे.”



सगळं काही जाणून घेण्याची उत्सुकते मुळे हुआनाच्या डोक्यात सतत वेगवेगळे प्रश्न निर्माण होत असत. एवढे मोठे चर्च त्यांनी कसे बांधले असेल? ते लोक कोणती भाषा बोलत आहेत? तिने जेव्हा लांब अंगरखे घातलेल्या नन्स बघितल्या तेव्हा तिने मावशीला विचारले, “टिया मारिया, नन्स काय करतात? त्या कान्वेंटमध्ये पूर्ण दिवस अभ्यास करू शकता का? लिहुवाचू शकतात का?”

जेव्हा हुआना आपल्या मावशीबरोबर त्या महालाच्या समोरून जाऊ लागली,तेव्हा तिने विचारले, “या महालात कोण राहते? ते आतमध्ये काय करतात?”

‘‘आत बाग आहे,” मावशीने सांगितले, आणि एक वाचनालय पण आहे. तिथे व्हाईसरॉय आणि त्यांची पत्नी राहते. ते आलेल्या पाहुण्यांना भेटतात आणि स्पेनच्या राजाला पत्रं पाठवतात. तिथे कवी पण येतात आणि एखादे नाटक केले जाते आणि संगीत कार्यक्रम आयोजित केला जातो.” हैं

‘‘मला तिथे राहायचे आहे!” हुआनाने उत्साहाने म्हटले, “मी नाटक आणि गीत लिहू शकते. मी गाऊन गाणं ऐकवू शकते. मी मन लावून खूप अभ्यास करेन’ हुआना इनेसने म्हटले. “आणि तेव्हा मी वाढदिवसाच्या दिवशी आणि उत्सवाच्या दिवशी आपल्या कुटुंबासाठी जे लिहते त्यापेक्षा अधिक चांगली कविता लिहिन. आणि टिया मी एका मोठ्या आशा पुस्तकालयात वाचू शकेन.





हुआनाने मन लावून अभ्यास केला आणि जेव्हा ती पंधरा वर्षाची झाली तेव्हा तिच्या मावशीने आणि मावश्याने तिला महालात नेले. “अच्छा तर तूच ती मुलगी आहेस जी खूप सारी पुस्तके वाचते आणि सुंदर कविता लिहते.” व्हाईसरॉयच्या पत्नीने विचारले. “तू गुलाबाच्या कळीसारखी सुंदर आहे हुआना इनेस. तू महालात राहून माझी सहाय्यक होशील का?” हुआनाचे गाल लाल झाले कारण तिला वाटले की एवढे लोक तिच्याकडे रोखून बघत आहेत.

जय दिवशी सकाळी ती महालाच्या पुस्तकालयात गेली, तेव्हा ती परत एकदम गप्प झाली. एवढी सारी पुस्तके! मोठी जागा खजान्याने भरलेला होता. आता ती सगळ्या प्रकारच्या पुस्तकांना स्पर्श करू शकत होती. ती वाचू शकत होती. ती हळूहळू त्यांची नावे वाचू लागली. तिने ताऱ्यांविषयीची पुस्तके वाचली, बायबलमध्ये असणाऱ्या सर्व स्त्रियाबद्दल वाचलं. तिने यूनानी आणि रोमन कहाण्या वाचल्या.





हुआनाने नाटक आणि कविता लिहल्या. लवकरच अनेक लोकांना समजले की तिला शब्दांशी खेळायला आवडते. ते तिच्याजवळ येत आणि त्यांच्यासाठी गाणी,कविता लिहायला सांगत. तिने गुलाबाकडे बघत म्हटले, “याचे टोचणारे काटे आहेत शाही -अंगरक्षक।'' आणि ती अजूनही जिज्ञासु होती म्हणून ती म्हणाली, “ मी असा विचार करते की फांदीवरून काढलेले गुलाबाचे फूल जास्त वेळ का टिकते? मग ती हसून म्हणे, “पुरुष जर स्वयंपाक करायला शिकले तर ते चांगल्या कविता लिहू शकतील.”

मला फक्त आपल्या डोळ्यांनी ऐका,

कान ऐकू शकत नाही कारण आवाज खूप लांबचा आहे,


माझ्या लेखणीतून ऐका, त्याच्या वेदना ऐका,

विरहाच्या वेदना ऐका,

आणि तुम्ही माझी कर्कश धुन पकडू शकत नाही,,

ऐकले नाहीसे करून ऐका, ती वेदना जी आता संपली आहे.





एक दिवस व्हाईसरॉय म्हणाले, “हुआना इनेस, मी विद्वानांना सांगत असतो की तू किती चतुर आहेस,पण ते माझ्यावर विश्वास ठेवत नाहीत. म्हणून मला ते सिद्ध करायचे आहे. मी चाळीस विद्वानांना तुला प्रश्न विचारण्यासाठी आमंत्रित केले आहे. माझे दरबारी सुद्धा तिथे उपस्थित राहतील आणि चर्चेचे साक्षीदार होतील.

“जर तुमची इच्छा असेल तर तुमचा हुकूम मी नक्की पाळेन. “तसेही माझे डोके प्रश्नांनी भरलेले असते. मी वयाच्या तिसऱ्या वर्षापासून वाचत आहे. त्यामुळे मी उत्तर शोधूनच काढेल.”

“तीन वर्षांची? व्हाईसरॉयच्या पत्नीने विचारले.

“हो,” हुआना हसली। “मी माझ्या मोठ्या बहिणीच्या मागेमागे शाळेत गेले होते.”

हुआना विचार करू लागली विद्वान तिला काय विचारतील? तिचे डोके भाषा, संख्या आणि संगीताने भरलेले होते.





विद्वान आपले काळे अंगरखे घालून आले. ते खूप गंभीर दिसत होते. त्यांनी हुआनाला त्रिकोण, चित्र, प्रसिद्ध पुरुष,एवढेच नाहीतर सूर्याची स्थितीत होणाऱ्या बदलांविषयी प्रश्न विचारले.



हुआनाने प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिले. जेव्हा विद्वानांचे विचारून झाले तेव्हा त्यांनी पटल्याची खूण केली आणि मान हलवली. हुआना हसली आणि ती म्हणाली, "हो हो, मुली शिवण टिपण शिवाय खूप काही करू शकतात. आम्ही अभ्यास करू शकतो आणि आम्हाला जे समजले आहे ते आम्ही सिद्ध करू शकतो." व्हाईसरॉयच्या पत्नीने तिला जवळ घेतले आणि एक सुंदर गुलाबाचे फूल भेट दिले.




हुआनाला महालात राहायला आवडत होते आणि तिथे तिच्या ज्या मैत्रिणी झाल्या होत्या त्याही तिला आवडत होत्या. पण तिला अजून शिकायचे होते. तिला विचार करायला आणि पंखांच्या पेनाने लिहण्यासाठी तिला एकांत हवा होता. म्हणून तिने नन होण्याचा निर्णय घेतला. तिने आपले नाव इनेस दे ला क्रूज़ (क्रास किंवा सलीबची इनेस) ठेवले. तिला कॉन्वेन्टमधली शांती आवडू लागली. तिने आपल्या जवळच्या पुस्तकालयातील सगळी पुस्तके वाचली. तोपर्यंत ते उत्तर आणि दक्षिण अमेरिकेटले सगळ्यात मोठे वाचनालय झाले नव्हते. ती आपल्या लांब अंगरखा घालून आशिर्वाद मागे, अभ्यास करे, पत्रं लिही, भजने, नाटक व कविता लिहीत असे. तिच्या मैत्रिणी तिला भेटायला येत तेव्हा ती त्यांच्याशी गप्पा मारे,हसत असे, त्यांना कोंडी घालत असे.

“या सिस्टर हुआना इनेस,” त्यांच्या एका चांगल्या मित्राने म्हटले. “या दोघी अमेरिकेतल्या प्रमुख कवियत्री आहेत, त्यांचे हे पुस्तक.” हुआनाने पुस्तकांवरचे कव्हर काढले आणि त्याच्या मुखपृष्ठावर त्यांचे नाव बघितले. त्यांनी पुस्तक दोन्ही हातांनी धरले आणि आपल्याजवळ पकडले. त्या रात्री सोर हुआनाने आपल्या पुस्तकालयात स्वतःचे पुस्तक ठेवले.



लेखकाच्या लेखणीतून



कवयित्री, महिला शिक्षणाचे समर्थक, बुद्धिजीवी, नाटककार, पर्यावरणवादी, बुद्धिमत्ता, मला १७ व्या शतकातील मेक्सिकन लेखिका जुआना रामिरेझ डेस असाबन्स, ज्यांना सोर जुआना इनेस म्हणूनही ओळखले जाते, त्यांचे वेड लागले आहे. या अपवादात्मक प्रतिभावान मुलीबद्दल आपल्याला फक्त काही तथ्ये माहिती आहेत.

तिचा जन्म सॅन मिगुएल दे नेपांतला या ग्रामीण भागात झाला होता, जेव्हा मेक्सिकोवर स्पॅनिश राजाने नियुक्त केलेल्या व्हाईसरॉयचे राज्य होते.त्याच्या शब्दांवरून त्याचे ज्ञानावरील गाढ प्रेम आणि जिज्ञासू मन दिसून येते. बरोक शैलीत लिहिलेल्या त्यांच्या कविता खूप लोकप्रिय होत्या. त्याला चित्रांचे परीक्षण करणे, संगीत वाजवणे, वैज्ञानिक उपकरणे गोळा करणे, त्याच्या मोठ्या आणि प्रसिद्ध ग्रंथालयातील हजारो पुस्तके वाचणे आणि अभ्यासणे खूप आवडायचे. जेव्हा मेक्सिकोमध्ये प्लेग पसरला तेव्हा सोर जुआना आजारी नन्सची काळजी घेत होती. पण ती स्वतःही त्या साथीला बळी पडली. १७ एप्रिल १६९५ रोजी त्यांचे निधन झाले.



या मेक्सिकन प्रतिभावान आणि मेक्सिकन फिनिक्स (जाळल्यानंतर पुन्हा जिवंत होणारा जादुई पक्षी) यांची प्रतिमा मेक्सिकन चलनावर छापलेली आहे. हिस्पॅनिक भाषिक जगातल्या मुलांकडून आणि प्रौढांकडून त्यांचे शब्द तोंडपाठ केले जातात. सोर जुआना: लॅटिन अमेरिकेतील पहिली महिला कवयित्री।

पैट मोरा तिच्या कविता, काल्पनिक कथा आणि बालपुस्तकांसाठी ओळखल्या जाणाऱ्या, त्या सहकारी कवयित्री जुआना इनेसच्या चाहत्या आहेत. तिला नॅशनल एंडोमेंट फॉर द आर्ट्स पोएट्री फेलोशिप आणि केलॉग नॅशनल फेलोशिप मिळाली आहे. तिने किशोरवयीन मुलांसाठी अद्‌भुत पुस्तके देखील लिहिली आहेत, ज्यात थॉमस अँड द लायब्ररी लेडीचा समावेश आहे.तो मूळचा टेक्सासमधील एल पासो येथील आहे. ती बहुसांस्कृतिक शिक्षणाची समर्थक आहे आणि देशभर प्रवास करून भाषणे देते. ती तिचा वेळ नैऋत्य आणि केंटकीमध्ये विभागते.

बिएट्रिज़ विडाने

काच, बारीक ब्रश आणि वॉटरकलर वापरून बनवलेल्या या चित्रांमधून जुआना इनेसची कहाणी जिवंत केली आहे. त्याची तंत्रे शेकडो वर्षांपूर्वी हस्तलिखित हस्तलिखिते स्पष्ट करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रासारखीच आहेत. सुश्री विडाल या बऱ्याच काळापासून सोर जुआना इनेस आणि त्यांच्या कवितेच्या चाहत्या आहेत. तिचा जन्म अर्जेंटिनामध्ये झाला. त्यांनी नॅन्सी व्हॅन लानच्या द लीजेंड ऑफ एल डोराडो आणि द रेनबो क्रो यासह अनेक सुंदर बालपुस्तकांचे चित्रण केले आहे. त्यांचे फोटो पीबीएस कार्यक्रम आणि युनिसेफ कार्डवर देखील वापरले गेले आहेत. ती न्यू यॉर्क शहरात राहते आणि पॅरिस आणि अर्जेंटिनामध्येही काम करते.

